दिनांक :  .१२.२०१९

**प्रती,**

**माननीय राज्यपाल,**

**आंध्रप्रदेश.**

**विषय : भाषारक्षणासाठी १ ली ते ६ वीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजीत शिक्षण देण्याची घोषणा रहित करण्याविषयी....**

महोदय,

भाषा ही धर्म आणि संस्कृती एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित करणारे एक महत्त्वाचे माध्यम आहे. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने मुलांचा बौद्धिक विकास होतो, हा जगन्मान्य सिद्धांत आहे. असे असतांन आंध्रप्रदेश सरकारने पहिली ते सहावीपर्यंतच्या शाळांमधून इंग्रजी शिकवण्याची घोषणा केली आहे. या घोषणेमुळे राज्यातील विद्यार्थ्यांना लहानपणापासून भारतीय भाषेपासून दूर नेऊन या विद्यार्थ्यांची भारतीय संस्कृतीशी असलेली नाळ तोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. वास्तविक तेलुगु ही राज्याची प्रथम भाषा आहे आणि या भाषेचे संरक्षण अन् संवर्धन करण्याचे दायित्व राज्य सरकारचे आहे. असे असतांना विद्यार्थ्यांवर इंग्रजी माध्यम लादणे अनाकलनीय आहे.

*** जगभरात भाषातज्ञ आणि शिक्षणतज्ञ यांनी केलेले विविध अभ्यास असे दर्शवतात की,**

१. मातृभाषेतून मूलभूत शिक्षण मिळाल्यास विद्यार्थी चांगली प्रगती करतात.

२. मातृभाषेतून शिक्षण दिल्यास विद्यार्थ्यांचे शाळांमधून गळतीचे प्रमाण अल्प होते.

३. प्राथमिक शिक्षण अन्य परकीय भाषेतून दिल्यास विद्यार्थ्यांना स्वभाषा आणि संस्कृती यांचा विसर पडतो.

४. दक्षिण कोरिया, जपान, जर्मनी, स्वीडन, रशिया, ब्राझील, चीन अशा प्रगत देशांमध्ये इंग्रजी अवश्य शिकवले जाते; परंतु तेथील शिक्षणाचे माध्यम मात्र त्यांची मातृभाषाच आहे. या सर्व देशांनी इंग्रजीविनाही विज्ञानात इतकी प्रगती केलेली आहे की, भारतातही तितकी प्रगती झालेली नाही. आज आपण मानसिक गुलामगिरीमुळेच मानू लागलो आहोत की, इंग्रजीविना आपले काम होणार नाही.

५. वरील सर्व देशांची अर्थव्यवस्था भारतापेक्षा सरस आहे. त्यांच्या भाषा आज समृद्ध झाल्या आहेत. या भाषांमधून शिकणाऱ्या लोकांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत आणि जागतिक स्पर्धेत त्यांची आस्थापने पाय रोवून उभी आहेत. यातून मातृभाषेतील शिक्षण किती महत्त्वाचे आहे, हे लक्षात येते.

६. मातृभाषेतून मिळणारे शिक्षण विद्यार्थ्यांच्या अंतर्मनापर्यंत पोचते, तर अन्य भाषेतील फक्त मेंदूच्या पातळीवरच राहते. मातृभाषेतून बोलणाऱ्या आणि लिहिणाऱ्या मुलांना इंग्रजी किंवा अन्य विदेशी माध्यमातून शिक्षण दिल्यास त्यांना ते आकलनाच्या पातळीवर जड पडते. कारण प्रथम येणारे ज्ञान हे मेंदूला मातृभाषेत रूपांतरित करावे लागते आणि नंतर ग्रहण केले जाते, हे शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध झाले आहे.

७. भविष्यातील उच्च शिक्षणाच्या सुलभीकरणासाठी प्राथमिक स्तरापासून इंग्रजी माध्यमाचा स्वीकार सयुक्तिक वाटत नाही; कारण फक्त १० ते १२ टक्के मुले उच्च शिक्षणापर्यंत पोचतात. आज देशभरातील अनेक शास्त्रज्ञ किंवा उच्चशिक्षित आणि प्रतिष्ठित व्यक्ती यांचे शिक्षण हे प्रथम मातृभाषेतच झाले आहे अन् नंतर त्यांनी उच्च शिक्षण इंग्रजी भाषेत घेऊन देशाचे नाव उज्ज्वल केले आहे.

८. आजचे युग संगणकाचे आहे. त्यामुळे इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे काळाची आवश्यकता आहे, हे जरी खरे असले, तरी त्यासाठी संपूर्ण शिक्षणच इंग्रजीतून घेण्याचा घाट घालणे कितपत योग्य आहे ? त्यामुळेच आज सरकार आणि पालक यांची दुर्दैवाने अशी मानसिकता झाली आहे की, मुलांच्या व्यावहारिक उन्नतीसाठी इंग्रजी अत्यावश्यक आहे.

९. म. गांधी यांनी लॉर्ड मेकॉलेने भारतात चालू केलेल्या शिक्षणप्रणालीविषयी म्हटले होते की, कोट्यवधी लोकांना इंग्रजी शिक्षण देणे, हे त्यांना गुलामीत टाकण्यासारखे आहे. मेकॉलेने शिक्षणाचा जो पाया रोवला, तो खरोखरच गुलामीचा पाया

होता. आईच्या दुधासोबत जे संस्कार मिळतात आणि त्यातून जे गोड शब्द ऐकू येतात, त्यांच्यात अन् शालेय शिक्षणात जो सुमेळ असला पाहिजे, तो विदेशी भाषेतून शिक्षण घेतल्याने तुटून जातो. आपण अशा शिक्षणास बळी पडून मातृद्रोह करतो.

१०. रविंद्रनाथ टागोरांनीही मातृभाषेचा अत्यंत आदर केला. त्यांनी म्हटले होते की, प्रत्येकाने मातृभाषेत शिक्षण घेणे, हा जन्मसिद्ध अधिकार आहे. जपानची जितकी प्रगती झाली आहे, ती त्यांच्या जपानी भाषेमुळेच झाली आहे. जपानने मातृभाषेच्या क्षमतेवर विश्वास ठेवला आणि इंग्रजीच्या प्रभुत्वापासून जपानी भाषेला दूर ठेवले. जपानी लोक अमेरिकेत जेव्हा जातात तेव्हाही ते तेथे मातृभाषेतच म्हणजे जपानी भाषेतच बोलतात.

**※ तरी या अनुषंगाने आम्ही पुढील मागण्या करत आहोत....**

१. आंध्रप्रदेश सरकारने शाळांमध्ये इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याऐवजी योग्य सुविधा पुरवणे, पालकांचे प्रबोधन करून मातृभाषेप्रती विश्वास जागृत करणे आदी गोष्टी करायला हव्यात.

२. तेलुगु भाषेचा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी, तसेच स्वभाषारक्षणासाठी १ ली ते ६ वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना इंग्रजीतून शिक्षण देण्याची घोषणा रहित करावी.

३. तेलुगु भाषेच्या संवर्धनासाठी सरकारने ‘तेलुगु ज्ञानपीठ’ किंवा ‘तेलुगु विद्यापिठ’ स्थापन करून विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण शिकवावे आणि त्याच भाषेतून विविध शोधनिबंधही सादर करावेत.

आपला विश्वासू,

स

.

प

क